3050

# इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

## —: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४३[illegible] (४०४)

ग्रंथ नाम यथार्थदीपिका

विषय म०वेदांत

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(१)

॥अथपपार्थदीपिकाप्रारंभः॥

" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योंनमः॥ श्रीकृष्णायनमः॥ ॥श्रीम
तभगवतेअनंतात्कृतदेवादिदेवायश्रीवासुदेवायनमः॥ ॥ जयजयभगवान्वासुदेव
जयजयदेवादिदेव॥ जयजययदुदेववासुदेव॥ अर्जुनगुरो॥१॥ जयजयजीभगवंता॥
ऐश्वर्यज्ञानवैराग्यवंता॥ धर्मयशश्रीमंता॥ षड्गुणा॥२॥ तूं गुणातीतनिर्गुण॥ तूंचि
सगुणतूंचिनिर्गुण॥ तूंचितुझेषड्गुण॥ तूंचिप्रत्यक्षअपरोक्ष॥३॥ इंद्रियेंआणिइंद्रिय
गम्य॥ तूंचिजोइंद्रियाअगम्य॥ तोचितूंध्येयरम्य॥ शेषशायी॥४॥ तूंनिर्गुणअनिर्वा
च्य॥ तोचितूंषड्गुणत्वेंवाच्य॥ वाच्यदितकेंअवाच्य॥ ठावनुरतांवाचेसी॥५॥ तुझेंऐ
श्वर्यतूंची॥ ऐश्वर्यशक्तीहीतुजीकेंची॥ अवघीसत्ताचिसाची॥ घटमृत्पिंडहीमत्ति
का॥६॥ परीषड्गुणाचेंविवरण॥ करितांदिसेकार्यकारण॥ षड्गुणत्वेंषड्विधपण॥ तेंभ
गवद्रूपजगहेंची॥७॥ जीश्रीसच्चिदानंदगुरु॥ जेंजेंवदलासिकल्पतरू॥ निर्गुणसुप ॥१॥

(2A)

र्णसगुणमेरू ॥ तोभेटला सियतिरूपें ॥ ८ ॥ तूंश्रीगुरू चिद्घन ॥ भगवद्गीतातुझेंवच
न ॥ प्रत्यक्षींषड्गुणाज्ञान ॥ व्याख्यानतेचगीतेचें ॥ ९ ॥ प्रत्यक्षसाहीगुणा ॥ णाहेतोचिभक्त
निपुणा ॥ आत्माभगवंतऐसीखुणा ॥ तोअनुभवगीतेचा ॥ १० ॥ ऐश्वर्यह्मणिजे समर्थ
पणे ॥ कींअघटीततें हाघडवणे ॥ विश्वनसोनिनिर्मिणे ॥ हें ऐश्वर्य ॥ ११ ॥ तंतू तूं विश्व
पट ॥ तूं मृत्तिकाविश्व घट ॥ ऐश्वर्यतेंहेंनिपट ॥ चराचरचि प्रत्यक्ष ॥ १२ ॥ विश्वपटीजोतं
तू ॥ जोनिजात्माप्रकाशकहेतू ॥ भक्तभागवतभगवंत तूं ॥ भेदकोठोनिआणावा ॥ १३ ॥
एवंजडचिंऐश्वर्यजैसें ॥ जगचितुझेंज्ञानतेसें ॥ येथेंद्वैततेंकैसें ॥ सांपडेलअणुमात्र
॥ १४ ॥ तूं स्कवर्णविश्वनग ॥ निर्गुणाहीहाविश्वयोग ॥ परीतूं नकल्पिसीजग ॥ तो हेर
चनाघडेना ॥ १५ ॥ अधिष्ठाननेणेविवर्ता ॥ तुजनिर्गुणीनप्रपंचवार्ता ॥ तोचिसर्वसाक्षी
विश्वभर्ता ॥ जाणोनिकल्पिसीसर्वज्ञ ॥ १६ ॥ श्रुतिबोलतीसर्व ॥ कींधाताकल्पीयथार

(3)

॥प॰दी॰॥ र्व॥सांख्यनिरीश्वरत्याचागर्व॥येथेंहरे॥१७॥जाणोनिकल्पितेंनर॥कल्पनातुझीचरा ॥अ॰१॥
॥३॥ चर॥जन्मादिसाहीविकार॥कल्पनातुझीसाक्षित्वें॥१८॥भूतभविष्यवर्तमान॥हेंकल्प
कासर्वज्ञाचेंज्ञान॥तेव्हांविश्वरूपेंचिध्यान॥जगत्कल्पकाच्याज्ञानाचें॥१९॥जरींअळंका
ररूप॥तरींसुवर्णाचेंतत्वरूप॥दृष्टीसथिजलेंविघरलेंतूप॥रसनेसरसएकचीं॥२०॥
४वृत्तीरूपज्ञानजग॥निर्धर्मज्ञानीत्याचासंयोग॥अधिष्ठानकनकींविवर्तनग॥दोनीरू
पेंहेमाचीं॥२०४॥एवंज्ञानदुसरागुण॥तोहीजगचिदेखेनिपुण॥ज्यासिजगदात्मत्वता
चीखुण॥बाणेदृढ॥२२॥विश्वनसोनिद्रावी॥हेऐश्वर्यशक्तीतुझीवदावी॥त्याचीसिधीअ
नुभवी॥याज्ञानगुणेदेखती॥२३॥प्राकृतनरेंहीकेलीकल्पना॥परीदेहप्रारब्धाचासाचा ॥२॥
मना॥वाटेतुजसतोअसेना॥तोदेहतुझाजेंकल्पिसी॥२४॥पुरुषएवेदंसर्वंअसें॥वेदबो
लेयाचिरसें॥मंगळाचरणमिसें॥गुह्यअनुभवहीबोलतो॥२५॥आपणासिआपणनर॥

(3A)

कल्पूनिदावीस्तंभाकार ॥ हेंज्ञानकल्पनाचराचर ॥ तरींचअतर्क्यऐश्वर्य ॥ २६ ॥ ऐसेंचि
ऐश्वर्याविण ॥ व्यर्थजगत्कल्पकपण ॥ स्वप्नप्रपंचकल्पीआपण ॥ भीआपणचिआपणा
सी ॥ २७ ॥ हस्तीजालास्वयें ॥ स्वयेंपळेत्याच्याभयें ॥ जगत्कल्पकनिश्चयें ॥ परिअनीश ॥ २८
ऐसेंऐश्वर्यआणिज्ञान ॥ जाग्रतीतकरीलकल्पूनिध्यान ॥ परीत्यासनराहेअनुसंधा
न ॥ विषयवासनेकरितां ॥ २९ ॥ प्रपंचमिथ्याकळला ॥ जरींपरमार्थेंविवळला ॥ तरीदेहआ
हेखवळला ॥ प्रारब्धकर्में ॥ ३० ॥ जरीबाणलेंध्यान ॥ क्षुधातृषावोढीमन ॥ ऐशासविश्व
कल्पनाउसंधान ॥ राहेलकैसें ॥ ३१ ॥ दुसेंअनादिवैराग्य ॥ ज्याच्यालवलेशेंअंत्नीसभा
ग्य ॥ त्यावैराग्येंतुजयोग्य ॥ करणेकल्पनाप्रपंचाची ॥ ३२ ॥ प्रथमसंकल्पापासुनी ॥
जोब्रह्मपरार्धेंदोनी ॥ सृष्टिस्थितिसंहारकल्पुनी ॥ अससीनव्हसीविक्षिप्त ॥ ३३ ॥ ए
वंऐश्वर्यहेतुज्ञान ॥ जेंजगत्कल्पनारूपचिंतन ॥ त्यासहेतुवैराग्यसंपन्न ॥ तूंस्वतः

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai.

(५)

॥य॰टी॰॥ सिध्य ॥३४॥ देवा हे आमुची बुध्दी ॥ कीं या करितां त्याची सिध्दी ॥ स्वतः सिध्दा शक्ती प्रसि ॥अ॰१॥
॥३॥ ध्दी ॥ ऐसी तुझी निगमता ॥३५॥ तुज वैराग्य गुण ॥ कल्पावया हेतू हे खुण ॥ तूं तों स्वतः
सिध्दीं निपुण ॥ सर्वेश्वर ॥३६॥ आतां वैराग्य ही हें चि जग ॥ रज्जू सन वाटे त्या भुजंग ॥ स्व
प्नासि वासना नग ॥ न उपजवी आपली ॥३७॥ प्रपंच वाटता सत्य ॥ तरीं वासना उपजती
अगत्य ॥ तूं सत्य कल्पिसी असत्य ॥ स्वतः सिध्द ऐसें वैराग्य ॥३८॥ ज्यास ठाउकी शुक्ती
॥ त्यास मिथ्या रजतीं विरक्ती ॥ तेंरूपें चि विरक्ती ऐसी युक्ती ॥ कीं जें न उपजवी अनुरा
ग ॥३९॥ वैराग्य नाशी अनुराग ॥ अनुराग नाशी विराग ॥ राग नाशक मिथ्या भाग ॥ वैरा
ग्य तुझें हें विश्व ॥४०॥ धर्म तेथे वैराग्य ॥ वैराग्यें ज्ञान ऐश्वर्य भाग्य ॥ तो धर्म तुज असणे यो
ग्य ॥ हें बुध्दी वैभव आमुचें ॥४१॥ लक्षोनि आमुच्या बुध्दी ॥ वेद सांगे तुझ्या स्वतः सिध्दी ॥ नि ॥३॥
गमागमी तुझी प्रसिध्दी ॥ अंशा निमित्त ॥४२॥ मुख्य धर्म समता दया ॥ हे दोनी गुण तुझे

(4A)

अव्यया ॥ कर्मानुरूपें देवराया ॥ फळें हरिसी वैराग्याचीं ॥ ४३ ॥ दयासमान सर्वांवरी ॥
मेघ सर्वत्र वृष्टी करी ॥ जो जैसी बीजें पेरी ॥ तैसीं फळें तो पावे ॥ ४४ ॥ जयासि जे जे प्रीती ॥ ते
ते तदर्थ कर्म करिती ॥ फळें तें तें चत्यां त्यां प्रती ॥ देसी देवा ॥ ४५ ॥ सकामासि देसी काम ॥
मुमुक्षूंस कैवल्य धाम ॥ देऊनि ही मोक्ष आत्माराम ॥ ऋणी होपावसी भक्तांचा ॥ ४६ ॥ स
मर्थ तूं अव्यया ॥ मुक्ती सकळा द्यावया ॥ आणि नेदीं मया ॥ हें निर्दयत्व येथें उडालें ॥ ४७ ॥
मुमुक्षा जया तया मुक्ती ॥ भुभुक्षा मया देसी भुक्ती ॥ इछित फळें देसी तुझी व्यक्ती ॥ गुण
हा कल्पवृक्षाचा ॥ ४८ ॥ ऐसा दयाळ आणी स्वसम ॥ हा तुझा स्वतःसिध धर्म ॥ तो धर्म ही
जगचि हें वर्म ॥ देवादिदेवा ॥ ४९ ॥ धर्म दिसे दो रूपें ॥ फळरूपें कीं कर्मस्वरूपें ॥ फळबंध तु
झ्याचरणप्रतापें ॥ कर्म अर्पिती नसे त्याला ॥ ५० ॥ तुज केंचें धर्मफळ ॥ धर्ममात्र असे
केवळ ॥ यज्ञादिरूपें प्रांजळ ॥ दिसे जैसा याज्ञिकाचा ॥ ५१ ॥ ते क्रां जगचि तुझा धर्म ॥ हे

(5)

॥य॰टी॰॥ च्चिसमत्वदयाळत्व धर्म ॥ वांछानुरूप प्राप्तीक्रम ॥ वैषम्यतादिसे ॥ ५२ ॥ अन्नसत्रीं अन्नेनाना ॥अ॰१॥
॥४॥ ॥ परी आवडी जे ज्याच्या मना ॥ तें तें चित्या त्या जना ॥ वाढितीं अन्नें ॥ ५३ ॥ ऐसें अन्नसत्र वसे
ते चिदात याची समतादिसे ॥ एवं जगचि धर्म असे ॥ भगवच्छब्द वाच्याचा ॥ ५४ ॥ एवं जगचि
मुक्ताची मुक्ती ॥ जगचि विषयासक्ताची भुक्ती ॥ समता दयारूपें अभिव्यक्ती ॥ जगचि तुझ्या
धर्माची ॥ ५५ ॥ तुझें धर्मरूप जग ॥ दोरी जैसा भुजंग ॥ तो दोरस्थ येउं उपासक मग ॥ वेगळें प
णा कैंचें भक्तासी ॥ ५६ ॥ आतां जेथें धर्म तेथें यश ॥ तेव्हां जग चित्त वंशें रमेश ॥ कीं समदया य
ळ हृषीकेश ॥ जगचि ऐसें गर्जतें ॥ ५७ ॥ या वेगळे जे जे गुण ॥ तें यश विवेकी खुण ॥ त्यागुणा
सहित निपुण ॥ देखती जगचि यशरूपें ॥ ५८ ॥ आतां श्रीनाम हीं यशाचें ॥ श्री वेंचूनि यश सा ॥४॥
धिती साचें ॥ श्री आणि यश परमपुरुषाचें ॥ हें चि जग ॥ ५९ ॥ दोरी जैसा भुजंग ॥ कीं सुवर्णामाजी
नग ॥ तैसें ब्रह्मीं जग ॥ मायामात्र ॥ ६० ॥ साकारलें ब्रह्म सगुण ॥ मायालक्ष्मी जाली आपण ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(5A)

अधिष्ठानीं माया तैसी निपुण ॥ श्रीधर हृदयीं धरीतीस ॥ ६१ ॥ चित्समुद्रीं मायातरंग ॥ ते
श्रीधर हृदयीं अंतरंग ॥ चित्समुद्र श्रीरंग ॥ हृदयीं श्रीयापरी ॥ ६२ ॥ एवं माया विश्वरूपें ते धरि
ली चित्स्वरूपें ॥ जेंसी धरी शुक्ती रुपें ॥ श्रीधरें धरिली श्री तैसी ॥ ६३ ॥ ऐसा तूं षड्गुण ॥ विश्वत
ज्ञें साहीगुण ॥ भगवच्छब्दवाच्य विश्वस्फुरण ॥ निजात्मपणा याकरिता ॥ ६४ ॥ एवं भगवच्छब्द वा
च्य जग ॥ आत्मरज्जूमाजी भुजंग ॥ हा भगवदैक्याचा योग ॥ दिधला तुवां भगवंता ॥ ६५
जीवत्वें आढळे प्रारब्धभोगीं ॥ विश्वात्मत्व या भागवत योगीं ॥ हे तुझी कृपा ईस उपयोगी ॥
भगवद्गीता ॥ ६६ ॥ त्या गीतेचा अर्थ ॥ देवतोचि परमार्थ ॥ जीचा वक्ता तूं समर्थ ॥ परमात्मा
भगवंता ॥ ६७ ॥ परी अजी भगवंत जी ॥ या कलियुगामाजी ॥ जो गीतार्थ योजी ॥ मतानुरूप
॥ ६८ ॥ जे योजिती निर्गुणपर ॥ त्यांस सगुणीं अनादर ॥ सगुणीच योजिती नर ॥ ते नेणती
निर्गुणत्वा ॥ ६९ ॥ दोंहींत केवळ सगुणवादी ॥ त्याची निष्ठा अखंड भेदी ॥ जयाचें भजन वर्षि

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(6)

॥य०दी०॥ ल्हेवेदीं॥ पशुतुल्य॥७०॥ श्रुतिः॥ अथयोन्यांदेवतामुपासतेन्योसावन्योहमस्मीतिनसवेद ॥अ०१॥
॥५॥ यथापशुः॥ श्रुत्यर्थः॥ देवअन्यमीअन्य॥ ऐसाभेदअन्योन्य॥ दाटोनिआणितीजघन्य॥ त्या
सहेश्रुतीनिंदिते॥७१॥ लणोनितेकेवळनिषिध॥ निर्गुणवादीज्ञानीप्रबुध॥ जेआत्मा
निर्गुणस्वतःसिध॥ अनुभवितो॥७२॥ जेसर्वथांमानितीवेद॥ जेनिषेधितीसमूळभेद
जेहरितीखेद॥ कांडत्रयाचा॥७३॥ चित्तशुधीकारणेंकर्म॥ ईश्वरप्रसादार्थउपास
नाधर्म॥ ज्ञानकांडीनिर्गुणब्रह्म॥ अनुभवितीआत्मत्वें॥७४॥ परंतुत्याचेंमत॥ जोंआत्मा
कळेनिश्चित॥ तोंवरीचउचित॥ सगुणोपासना॥७५॥ आणिभगवंतातुझेंमत॥ कींनि
र्गुणात्मकअद्वैत॥ कळोनिमाझेचरणीरत॥ भक्तसकळीततोथोरें॥७६॥ ऐसेगीतेतजे ॥५॥
थें॥ तेवारवाणितीविपरीतलेथें॥ पूर्वापरविचारितांयेथें॥ गीताअसाहोतोअर्थ॥७७॥ तेतों
परमसर्वज्ञ॥ त्यांसबोलठेवीतोचिअज्ञ॥ तरींकांबोलतीऐसेंअभिज्ञ॥ विरळासमजेहेंतेंते

(6A)

॥७८॥ श्रीगुरुरूपें देवा॥ मज भेटला सिवासुदेवा॥ तेव्हां हें रहस्य देवादिदेवा॥ बोलिलासी
॥७९॥ तुझीं वचनें तुज प्रती॥ यालागीं बोलतों जी श्रीपती॥ कीं श्रोते तुझ्याच मूर्ती॥ तूंचि
विश्वरूप भगवंता॥८०॥ कलियुगीं प्रबळ बोध॥ वेद जाले असिध॥ तेक्षीपा बळ होतां
प्रसिध॥ जालीं मतें भेदाश्रित॥८१॥ प्रत्यक्षवादी चार्वाक॥ ज्यांच्या मतें न स्वर्ग नरक॥ न
कर्मभोग तेव्हां फळदायक॥ जगदीशाचेंया॥८२॥ ज्यांच्या मतें वेद असिध॥ त्यां सिवाद वे
दसिध॥ न करवे म्हणोनि प्रसिध॥ तर्कशास्त्र जालें॥८३॥ आपला एक सिधांत ठरावा॥
तेव्हां वादियासीं वाद करावा॥ अन्यथा त्या वादा संपरावा॥ वितंडवाद म्हणोल॥८४॥ स्व
सिधांत बोलावा अभेद॥ तरीं तो न साधे विना वेद॥ यालागीं सिधांत आपला भेद तार्कि
कें गौतमें धरिला॥८५॥ कार्यापुरतें नृपती॥ शत्रू हा घडिएक हातीं धरिती॥ तथापि अं
तरीं चिंतिती॥ घात त्याचा॥८६॥ दुःखबीजें एकवीस॥ गौतम म्हणे त्याचा ध्वंस॥ तोचि

... Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(7)

॥प॰दी॰॥ मोक्ष तरीं हे परमहंस ॥ अद्वैतानुभवी हा मानिती ॥ जीवास अखंड ब्रह्मत्व ॥ ब्रह्म च मोक्षसु ॥अ॰१॥

॥६॥ खहें तत्व ॥ दुःखनाशें मुक्तत्व ॥ अद्वैत सिधांत हा ऐसा ॥ ८८ ॥ एवं अंतरीं अद्वैत ॥ बहिरंग का

र्यार्थ धरिलें द्वैत ॥ अगत्य वेद विरुध मत ॥ खंडावया ॥ ८९ ॥ परी हें नेणती लोक ॥ गोड वाटती

गोतम तर्क ॥ म्हणोनि ते अद्वैत अर्क ॥ न पाहती जाले दिवांध ॥ ९० ॥ श्रधा उपजली वेदीं ॥ परं

तु जाले कुतर्कवादी ॥ ते ही वाळिले अभेदी ॥ जसे तसे ॥ ९१ ॥ कळलिया ही निर्गुण ॥ मागुती भ

जावा सगुण ॥ ऐसें बोलतां ते तर्कनिपुण ॥ हांसती लशास्त्रासी ॥ ९२ ॥ कीं संसार अधम ज्या

च्या मतें ॥ निर्गुणात्मा वळखिला जायतें ॥ पुन्हा मायीक सगुण भक्ती त्यातें ॥ कां बोलती ॥ ९३ ॥

आतां सांगावें त्यां स सार ॥ कीं कळलें जरी निर्विकार ॥ तरी मन जालें पाहिजे तदाकार ॥ यानि ॥६॥

मित्त सेव्य गुरुदेव ॥ ९४ ॥ निर्गुणात्मा कळल्यावरी ॥ गुरुदेवाची भक्ती करी ॥ ते व्हां अपरोक्ष

बरवे परी ॥ बिंबे हें तों श्रुतिसिध ॥ ९५ ॥ श्रुति ॥ यस्य देवे परा भक्ति र्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यै

(7A)

तेकथिताह्यर्थः प्रकाशंते महात्मनः ॥ श्रुत्यर्थः ॥ श्रुतिम्हणे देवाचीभक्ती ॥ तैसीच गुरुच
रणी अनुरक्ती ॥ तेव्हां त्या गुरूच्या उक्ती ॥ प्रकाशती याला ॥ ९६ ॥ कीं ब्रह्म वळखे बुधी ॥ मग गु
रुदेवभक्तीने स्थैर्यसिधी ॥ करावी तेणे रहस्याचीप्रसिधी ॥ तेव्हां त्यास ॥ ९७ ॥ तेव्हां कठिण
वाटे निमुक्ती ॥ पाशास्त्रींन धरिती अनुरक्ती ॥ म्हणोनि निर्गुण कळे तों चि भक्ती ॥ शास्त्र
कार म्हणती सगुणाची ॥ ९८ ॥ परंतु संशय तैसा चित्तीं ॥ कीं जे निर्गुणात्मत्व समजती ॥ ति
गुरुदेवाची प्रीती ॥ धरितील चि अत्यंत ॥ ९९ ॥ साकरेच्या औषधी ॥ रोगनिवृत्ती ते चि अव
धी ॥ मग म्हणोनि रोगी ही कधीं ॥ न सोडी गोड साकर ॥ १०० ॥ अमर जाले अमर ॥ तरी पीती
अमृत सादर ॥ न सांगतां ही हा प्रकार ॥ जीवन्मुक्त करितील ॥ १ ॥ एवं मूर्ख समजावणीका
रणे ॥ अगत्य लागलें अंगिकारणे ॥ कीं निर्गुण कळल्या सगुण ॥ कां भजावें ॥ २ ॥ कीं शास्त्रा
चा आरंभकाळ ॥ ऐसाच होतां कीं लोक सकळ ॥ कुतर्कवादी प्रबळ ॥ जसे तसे आणावे स

॥य॰दी॰॥ न्मार्गे॥३॥ हें न कळोनि अंतरंग॥ शब्दज्ञानी जे बहिरंग॥ त्यास भजनत्यागप्रसंग॥ प्रा ॥अ॰१८॥
॥७॥ प्त जाला॥४॥ जडनिषेधें चैतन्य॥ इतकें कळतां चि मानिती धन्य॥ मनीं तथा राज घन्य॥ वि
षयवासनेचा॥५॥ सगुणाची अद्वैत भक्ती॥ करितां पूर्विल विषय विरक्ती॥ दृढ होतां होय
मुक्ती॥ हें शब्दज्ञानी नेणती॥६॥ पिसाटाऱ्याकरीं कोलित॥ तैसें त्यांस शास्त्र संमत॥ परी
त्यांचा अंतरंग सिद्धांत॥ नकळे त्यांला॥७॥ पशूंस पाजावया पाणी॥ वडिलीं कूप खार
वणी॥ केला स्नपोनि गोडवणी॥ न प्यावें काय॥८॥ असो ते प्रस्तुत शास्त्र वाणी॥ ऐसी अ
जी चक्रपाणी॥ परी मीनपीं तें क्षार पाणी॥ वडिलीं केलें स्नपोनी॥९॥ भवद्रुमा छेदी शस्त्र
॥ऐसें तुझें गीताशास्त्र॥ त्याची दाविती पाठिमात्र॥ धार लपविती ये रिती॥१०॥ खड्गास ॥७॥
मुख्य पाणी॥ तैसी भक्ती तुझी वाणी॥ गीलेच्या अंतीं चक्रपाणी॥ ऐसी चि बोलिलासी॥११॥
अष्टादशाध्यायश्लोक॥ य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति॥ भक्तिं मयि परां कृत्वा मा

(8A)

मेवैष्यत्यसंशयः ॥ ॥ ज्ञानभक्ती वैराग्य ॥ गीतेंत तीनी यथायोग्य ॥ त्यांत भक्ती जो स
भाग्य ॥ थोर करूनि सांगे ॥ १२ ॥ गीता सिंधू मथन ॥ करूनि भक्ती सुधेचें कथन ॥ थोर करू
नि सांगे जो जन ॥ तो अनायासें मज पावे ॥ १४ ॥ याहूनि पुढील श्लोक ॥ त्यांत स्वपासी तूं
उत्तमश्लोक ॥ कीर्तैसा पाहतां त्रिलोक ॥ प्रिय जाला न होईल ॥ १५ ॥ कोणी येथें आणीक
अर्थ ॥ करिती तो न के समर्थ ॥ पुढें विषद होणार येथें व्यर्थ ॥ ग्रंथ कां जी वाढऊं ॥ १६ ॥ को
व्या मिसें तरी कोणी ॥ गीतार्थ अन्यथा वाखाणी ॥ मज नावडे ते थोराची ही वाणी ॥ का
यकरूं जी श्रीकृष्णा ॥ १६ ॥ संसार छेदक सार ॥ गीता शास्त्र भक्ति आधार ॥ तें झांकूनि
नुसतें चि निराकार ॥ मात्र दाविती ॥ १७ ॥ जड देह निषेधें निराकार ॥ आत्मा कळला हा प्र
कार ॥ व्यतिरेक ज्ञान प्रथम विचार ॥ हाचि आत्मज्ञानाचा ॥ १८ ॥ उरला प्रपंच देह अहंतेसं
॥ हे जड भ्रांती रूप द्वैत ॥ तें ही ब्रह्मचि कळतां अद्वैत ॥ तत्व आलें अनुभवा ॥ १९ ॥ जड चैतन्य

॥प.दी.॥ विवेक॥याज्ञानाचेंनावव्यतिरेक॥जडीअनेकींपाहणेएक॥अन्वयज्ञानयानाव॥२०॥तेंक ॥अ.१॥
॥८॥ ळतांजग॥आत्मरज्जूंतहोयभुजग॥तथापिआत्मसुवर्णिनानानग॥श्रुतीऐसेंचवर्णि
ती॥२१॥कींरज्जूकळल्याउपरी॥सर्पदिसोनयेवरी॥जीवन्मुक्तासतरीं॥प्रपंचदिसतो
॥२२॥जरींदिसेयथापूर्वजग॥तरींसोनेंचनुसतेंजेंसेंनग॥श्लो.वर्णयाचकासउबग॥कांआ
कारासयेईल॥२३॥एवंप्रपंचदिसे॥तथापिब्रह्मचिअसे॥सगुणभक्तीसमरसे॥तेयाप्र
कारें॥२४॥ब्रह्मविद्येचेंवैभव॥ऐसासगुणभक्तीचाअनुभव॥गीतेंतथोरहाभक्तिभाव॥
सर्वअसेवर्णिला॥२५॥ऐसेंब्रह्मतेंचिसगुण॥ऐसाज्ञाननिष्टभक्तनिपुण॥भगवंतभा
गवतऐसीखुण॥जेथेंवेगळीनसांपडे॥२६॥सगुणब्रह्मचराचर॥गीतेंतयाज्ञानाचाआ ॥८॥
दर॥म्हणोनिधर्म्यपदवारंवार॥याब्रह्मज्ञानींयोजिलें॥२७॥नवमाध्यायश्लोक॥
प्रत्यक्षावगमंधर्म्यंश्लो.श्लो.सुखंकर्तुमव्ययं॥द्वादशाध्याय॥येतुधर्म्यामृतमिदंयथो

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(9A)

क्तः पर्युपासते ॥ अष्टादशाध्याय ॥ अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ॥ एवं ऐसें ध
र्म्यपद ॥ भगवान् बोले प्रतिपद ॥ याचा अर्थ विषद ॥ न बोलती कोणी ॥ २८ ॥ निर्धर्मस्वरूप
जे निर्गुण ॥ सधर्मस्वरूप जे सगुण ॥ धर्म्यशब्दें दावी खुण ॥ विश्वात्म ज्ञानाची ॥ २९ ॥ पुढें हो
ईल विषद ॥ जे जे गायी धर्म्यपद ॥ हें मग कांचरपा छछपद ॥ स्मरता आठवे समग्र गीता
॥ ३० ॥ याकारणें जी भगवंता ॥ यथार्थ लिहे तुझी गीता ॥ था खापां वीस्तरणो निहोता ॥
बहुत काळ संकल्प ॥ ३१ ॥ आणि तुझ्या कृपेचे विभागी ॥ शिष्य संत भक्त योगी ॥ तत्स्वपाती
की जगदुपयोगी ॥ ऐसी टीका करावी ॥ ३२ ॥ परंतु देवकीनंदन ॥ जेव्हां देईल अनुमोदन ॥
तेव्हांच करूनि त्यालें वंदन ॥ करीन पोटीं हा भाव ॥ ३३ ॥ तें अनुमोदन दिसेना ॥ हृदयीं दाट
लीगी तार्थ रचना ॥ बुद्धी प्रेरकाचिया मना ॥ तेचि आज्ञा वाटली ॥ ३४ ॥ आत्मा चि तूं निरवि
ळ ॥ जो बुद्धी प्रकाशी निर्मळ ॥ टीका आरंभाची केवळ ॥ तेचि आज्ञा वाटली ॥ ३५ ॥ करूनि

॥ग॰टी॰॥ तुझें स्मरण॥ ध्यानीं चिंतूनि चरण॥ आरंभिलें मंगळाचरण॥ प्रथवैंमेवी संस्कृत॥३६॥ विश्व ॥अ॰१॥
॥९॥ रूपें करूनि स्मरण॥ भगवत्पदें मंगलाचरण॥ सातवींविया होतां पूर्ण॥ आरंभिलीवोंवी
आठवी॥३७॥ वोंवी लिहितां आठवी॥ तु जगुरु रूपें आठवी॥ यति रूपें स्मरतां आठवी॥ अ
वतार मूर्ति दिससी॥३८॥ करींवा गोरे सारथी॥ बैसला अर्जुनाचे रथीं॥ तो चि वामन नम
नोरथीं॥ टीका करितो सि गोविंदा॥३९॥ तूंचि लेखनी तूंचि मसी॥ तूं पत्र विचित्र पदें होसी
॥ तूंचि अर्थ भावार्थ स्फुरसी॥ तूंचि ऐसा अनुभव॥४०॥ तूंचि वामन रूपें दिससी॥ त्रिवि
क्रम तूंचि अनुभवीं होसी॥ स्फुरोनि विश्वरूपें उरसी॥ अनंत त्वें सर्वदां॥४१॥ हें चि तु
झें मंगलाचरण॥ आतां स्मरोनि तुझे चरण॥ गीतार्थाचें विवरण॥ करीन तुझ्या प्रसा ॥९॥
दें॥४२॥ धृतराष्ट्राचे पुत्र शत॥ पांच पंडूचे सुत॥ सैन्य मेळऊनि बहुत॥ झगडों पाहती
कुरुक्षेत्रीं॥४३॥ धृतराष्ट्र हस्तिनापुरीं॥ अंधत्वपणें निराहिला घरीं॥ त्यास वर्तमान श्रु

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(10A)

तकरी॥संजयशिष्यव्यासाचा॥४४॥धृतराष्ट्राकारणें ऐसें॥त्यास सामर्थ्य दिधलें व्या
सें॥कीं दों सैन्यांत जें जैसें॥वर्तेल तें कळावें तयास॥४५॥धृतराष्ट्र संजया॥प्रश्न करी है
जनमेजया॥वैशंपायन वदे तेथोनियां॥आरंभ भगवद्गीतेचा॥४६॥व्यासशिष्य वै
शंपायन॥जनमेजय परिक्षितानंदन॥तो त्यासि सांगे संजयाप्रति प्रश्न॥करितो रा
जा धृतराष्ट्र॥४७॥ ॥श्लोक॥ ॥धृतराष्ट्र उवाच॥ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयु
त्सवः॥मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय॥१॥टीका॥धृतराष्ट्र अंबिकापुत्र॥म्ह
णे संजया कुरुक्षेत्र॥धर्मपिकाचें परम क्षेत्र॥उभय पक्ष तेथें मिळाले॥४८॥युधाची
अपेक्षा मनीं॥ऐसे दोनी पक्ष मिळोनी॥कुरुक्षेत्रभूमी पावनी॥तेथें काय करिते जाहले
॥४९॥त्यांत माझेच एकशत॥दुर्योधनादि सर्वांस विदित॥ते पांचपंडूचे हि सुत॥होती
चकीं॥५०॥कुंती माद्री पंडूच्या स्त्रिया॥जरीं आणिकां पासोनि गर्भ तयां॥तरी अगा संज

Joint project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

# मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com